ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : इतिहासकर्ते मराठे

रचनाकार : गणेश हरी खरे

प्रकाशक : भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

प्रकाशन वर्ष : १९५१

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२०

इतिहासकर्ते मराठे

गणेश हरी खरे

भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ८०

कै. वि. का. राजवाडे स्मारक चित्रगुच्छ क्र. १

इतिहासकर्ते मराठे

रचनाकार
गणेश हरी खरे
क्यूरेटर : भा. इ. सं. मंडळ

MAKERS OF MARATHA HISTORY

BY
G. H. KHARE
Curator B. I. S. Mandala

ग्रं. १८७२] मूल्य २ रु. Price Rs. 2 [1951 A. D.

भा. इ. सं. मंडळाचे सभासदास १ रुपया

चित्रानुक्रम

१	छत्रपति शिवाजी महाराज	Chhatrapati Shivājī, the (
२	छत्रपति शाहू	Chhatrapati Shāhū
३	सरदार पिलाजी जाधव	General Pilājī Jādhava
४	बाजीराव बल्लाळ पेशवे	Peshwa Bājīrāo Ballāḷa
५	बाळाजी बाजीराव पेशवे	Peshwa Bāḷājī Bājīrāo
६	सरदार जयाप्पा शिंदे	General Jayāppā Shinde
७	माधवराव बल्लाळ पेशवे	Peshwa Mādhavarāo Ball:
८	छत्रपति प्रतापसिंह	Chhatrapati Pratāpasiṁha
९	बाजीराव रघुनाथ पेशवे	Peshwa Bājīrāo Raghunāt
१०	सरदार बापू गोखले	General Bāpū Gokhale

मुद्रक : सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी. ए., एल्एल्. बी., नर्व

समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना,

४१ बुधवार, पुणें २

प्रकाशक : श्री. चिं. ग. कर्वे, चिटणीस भा. इ. सं. मंडळ,

३१३ अ सदाशिव, पुणें २

निवेदन

भा. इ. सं. मंडळ पहावयास येणारे अनेक सद्गृहस्थ मंडळांतील चित्रांच्या मुद्रित प्रति घेऊं इच्छितात. तसें पाहिलें तर मंडळानें आपल्या संग्रहांतील दहा ऐतिहासिक व्यक्तींचीं चित्रें आजवर छापून प्रसिद्ध केलीं. पण त्यांतील एक किंवा दोन चित्रांच्याच काय त्या सुट्या प्रति मंडळांत विक्रीसाठीं आहेत. इतर संग्रहालयांप्रमाणें मंडळानेंही चित्रांच्या मुद्रित प्रतींचे संच काढावे असा विचार चालू होता. इतक्यांत मंडळाचे एक विश्वस्त, कारभारी, पहिल्या वर्गाचे आजीव सभासद व मंडळावर सतत लोभ ठेवणारे दानशूर, श्रीमान् पांडुरंग केशव शिराळकर यांनीं कै. वि. का. राजवाडे यांची चिरकाल स्मृति राहावी या उद्देशानें मंडळास एक हजार रुपये देणगी दिली. तीमधून प्रायः मंडळांतील चित्रांचें प्रस्तुत पुस्तक प्रकाशित होत आहे. यांतील चित्रांचा स्वतंत्र संचही लवकरच प्रसिद्ध होईल. अशा तऱ्हेनें आणखीही कांहीं चित्रें, पुस्तक व संच अशा दोन्ही रूपांत, प्रकाशित करावीं अशी मंडळाची इच्छा आहे.

प्रस्तुत चित्रांपैकीं पहिल्याचें मूळ फ्रान्समधील बिब्लिओथेक नेशनेलमध्यें आहे. हें चित्र यापूर्वी दुसरीकड अनेक ठिकाणीं प्रकाशित झालें आहे. याची फोटोप्रत येथील डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रीसर्च इन्स्टिटयूटमध्यें आहे. तिच्या फोटोवरून हें चित्र छापलें आहे. क्र. २ मंडळसंग्रहांतील आहे. त्याचे पाठीवर मोडींत शाहू महाराज असा लेख आहे. क्र. ३ व ४ हीं दोन चित्रें वाडीकर जाधवाकडून मंडळसंग्रहांत दाखल झालीं आहेत. यांचे घराण्यांत तीं अनुक्रमें पहिला बाजीराव व पिलाजी जाधव यांचीं असल्याची पारंपरिक माहिती होती. चित्रांचा तपशील ध्यानांत घेतां या माहितींत तथ्य असावें असें वाटतें. क्र. ५ चे पाठीवर मोडींत 'श्रीमंत बालाजी बाजीराव प्रधान' व 'सिवरामाचे हातची तसवीर' असे दोन लेख आहेत. क्र. ६ चें मूळ जोधपूरच्या सरदार म्यूझियममध्यें (तेथील क्र. २६६) आहे. त्याचा फोटो मी इ. १९४०।४१

मधील माझ्या ज्ञानयात्रेंत जोधपूर म्यूझियमचा अभ्यास करण्यासाठीं गेलों असतां घेतला. म्यूझियमच्या व्यवस्थापकांनीं यावर जयाप्पा शिंदे असें नांव घातलें होतें. माझ्या टिपणाप्रमाणें याच्या पाठीवर जुन्या राजस्थानी लिपींत '।दा। ढोलीयारे कोठार' व '। कलम अमरदासरे हाथरी' असे दोन लेख आहेत. मला तेव्हां या चित्राचा प्रामाणिकपणा पटला म्हणून मी त्याचा फोटो उतरला होता. याच म्यूझियममध्यें महादजी शिंद्यांचें एक चित्र असून (क्र. २६४) त्याचे पाठीवर ।। पटल · माधजी सुदो । दा ढोलीयारे कोठार । ऊदेरांमरे हाथरी असे तीन लेख आहेत. यांची व उपर्युक्त चित्रांच्या पाठीवरील लेखांची पद्धत एकच आहे. म्हणून प्रस्तुत चित्रावर मला माझ्या पाहणींत नांव आढळलें नसलें तरी म्यूझियमच्या व्यवस्थापकांना तें नांव आढळलें असावें. क्र. ७ चें मूळ कै. गोविंदराव आपटे यांनीं व क्र. ८-१० चीं मूळें सातारा येथील श्री. चितळे यांनीं मंडळास प्रदान केलीं आहेत. क्र. ७ व ८ यांची ओळख पारंपरिक माहितीवर आधारलेली आहे. क्र. ९ च्या आरंभीं फार्सी भाषेंत 'अमल-इ-सयियद घुलाम हसनखान, शबीह श्रीमंत महाराजा बाजीराव बहादुर, तहरीर दूयम शव्वाल सनह १२३६ हिजरा दर पूना' असा त्रिखंडात्मक लेख असून पाठीवर मोडींत बाजीराव साहेब उर्फ बाजीराव रघुनाथ पेशवे असा लेख आहे. हे लेख व चित्राचा तपशील यामुळें हें चित्र दुसऱ्या बाजीरावाचें होत असलें तरी कालनिर्देशावरून हें नक्कल तरी असावें किंवा उपर्युक्त लेखन मागाहूनचें असावें असें ठरतें. क्र. १० चे पाठीवर बापू गोखले असा लेख आहे.

श्रीमान् पां. के. शिराळकर यांनीं उदार देणगी दिली, डेक्कन कॉलेज व सरदार म्यूझियम यांच्या अधिकाऱ्यांनीं अनुक्रमें फोटोप्रत व चित्र छापण्यास परवानगी दिली आणि महामहोपाध्याय प्रो. द. वा. पोतदार यांनीं इंग्रजी चित्रपरिचय करून दिला. म्हणून मंडळ या सर्वांचें ऋणी आहे.

१।२।१९५१ ग. ह. खरे

FOREWORD

Several visitors who visit the museum of the B. I. S. Maṇḍala wish to purchase printed copies of some of the paintings in its possession. The Maṇḍala has already published ten of its historical portraits; but only one or two of them can be had now. The Maṇḍala for a long time had intended to make the reproductions of its paintings available to the public in the form of albums and sets. Fortunately last year Shri Panduranga Keshava Shiralkar of Karad (North Satara), a trustee and a member of the Managing Committee of the Maṇḍala donated a sum of one thousand rupees towards the commemoration of the late V. K. Rajwade, a *savant* of Maratha History and a founder of the Maṇḍala. The present album is the outcome of the donation. The Maṇḍala wishes to bring out several such albums.

The original of No. 1 is in the Bibliotheque Nationale of France and it has been reproduced from a photo of a photograph belonging to the Deccan College Post-graduate and Research Institute, Poona. It has already been reproduced elsewhere in several places. The original of No. 6 belongs to the Sardar Museum, Jodhapur. It was photographed by me in my study-visit to the Museum early in 1941. It bears the Museum No. 266, label Jayāppā Shinde and the two legends in Rājastānī on the back of this painting imply that it is the work of Amaradāsa and belonged to the depositary of one Ḍholīyā. Exhibit No. 264 from the same Museum bears the label Mahādajī Shinde and the legends on its back imply that it represents Mahādajī Shinde, that it was executed by Ūderāma and also that it belonged to the depositary of Ḍholīyā. Thus though I could not get any clue to the identification of the former portrait in its exposed

part, I believe the identification to be quit ecertain and it has therefore been included in this album. The originals of the rest are in the Maṇḍala's possession. No. 2 bears the name of Shāhū, presumably of Satara, on its back and I have accepted the identity. Nos. 3 and 4 come from a descendant of the person portrayed in No. 3 and they are traditionally identified to be of Pilājī Jādhava and Bājīrāo I. The back of No. 5 bears in *modi* script two legends giving the name of the portrait and its artist as Bāḷājī Bājīrāo Pradhāna and Śivarāma respectively. The identification of Nos. 7 and 8 is traditional. No. 9 has a legend on the back which gives the name of the portrait as Peshwa Bājīrāo Raghunātha. Besides this legend, a small inscription in three parts in the upper portion of the front side implies that this portrait of Bājīrāo was finished by Sayyid Ghulām Ḥaṣankhān on the 2nd of Shawwāl 1236 Hijra (3-7-1821 A.D.) at Poona. This evidently shows either that ours is a copy or that the inscription is a later addition. No. 10 bears the name Bāpū Gokhale on its back.

I thank the authorities of both the Deccan College Post-graduate and Research Institute and the Sardar Museum for their kind permission to reproduce the photograph and the original in their possession. Thanks are also due to Mahamahopadhyaya Prof. D. V. Potdar, the President of the Managing Committee of this Maṇḍala for kindly contributing the English version of this album and to Shri P. K. Shiralkar for his very munificent donation without which the intention of the Maṇḍala would not have been realised so soon.

1-2-1951

G. H. KHARE

छत्रपति शिवाजी महाराज

CHHATRAPATI SHIVĀJI, THE GREAT

छत्रपति शिवाजी महाराज

जन्म : श. १५५१ फाल्गुन वद्य ३ मृत्यु : श. १६०२ चैत्र शुद्ध १५

लहानपणीं आई व कारभारी यांच्या देखरेखीखालीं शिक्षण घेऊन महाराज सोळाव्या वर्षी स्वत: जागिरीचा कारभार पाहूं लागले. यांनीं परकीय मुसलमानी सत्ताधाऱ्यांशीं सतत तीस वर्षे झगडून श. १५९६ मध्यें स्वतःस राज्याभिषेक करून घेतला व महाराष्ट्राचें स्वातंत्र्य जाहीर केलें. नंतरच्या दाक्षिणदिग्विजयामुळें औरंगजेबाच्या दक्षिणेवरील संभाव्य आक्रमणाच्या विरोधाची तरतूद होते न होते तोंच ते वारले. पण या अवधींत त्यांनीं मराठ्यांच्या ठिकाणीं अशा गुणांचा परिपोष केला कीं, त्यांनीं औरंगजेबाची दक्षिणेवरील २५ वर्षांची स्वारी पूर्ण विफल करून थोड्या अवधींत मराठी राज्याचें साम्राज्य करून दाखविलें.

CHHATRAPATI SHIVĀJĪ, THE GREAT

Birth : 19–2–1630 A.D. Death : 3–4–1680 A.D.

The illustrious son of Mahārāja Shahājī Bhosale, Shivājī, when only sixteen, laid the foundation of Maratha Svarājya. His magnetic personality welded the Marathas into a great nation. He made Mahārāṣṭra free from the yoke of Muhammadans and after an incessant struggle for thirty years crowned himself as Chhatrapati or an independent sovereign in 1674 at Raigaḍh. He extended his power as far South as Tanjore into the *Jagir* of his father. This later served as a safe base for the Marathas against the onslaughts of Aurangzeb who was completely vanquished by the Marathas and they later developed his Svarājya into a great Empire.



छत्रपति शिवाजी महाराज Shivājī, the Great

छत्रपति शाहू

CHHATRAPATI SHĀHŪ

छत्रपति शाहू

जन्म : श. १६०४ वैशाख वद्य ७ मृत्यु : श. १६७१ मार्गशीर्ष वद्य ३

याचें बालपण दक्षिणेंत औरंगजेबाच्या कैदेंत गेल्यामुळें शिक्षण व राज्यकारभाराचा अनुभव या दोन्ही गोष्टींचा लाभ यास प्रायः झाला नव्हता. इ. स. १७०७ मध्यें कैदेंतून सुटल्यापासून सुमारें ३० वर्षें खटपट करून यानें आपलें राज्य महाराष्ट्रांत स्थिर केलें. मृदु स्वभावामुळें याचा हाताखालच्या सरदारांवर व नोकरांवर आवश्यक तितका वचक बसला नाहीं हें खरें असलें तरी यानें त्यांस योग्य कार्यक्षेत्र मिळवून दिल्यामुळें हिंदुस्थानांत मराठ्यांचें साम्राज्य होण्यास याच्या स्वभाववैशिष्ट्याची फार मदत झाली. विशेषतः सरदारांची आपसांतील भांडणें तोडण्याचें काम यानें फार कुशलतेनें केल्यामुळें सरदारांचा आपसांत सलोखा राहिला.

CHHATRAPATI SHĀHŪ

Birth : 19–5–1682 A.D. Death : 15–12–1749 A.D.

Son of Sambhājī and grandson of Shivājī, Shāhū was a captive in the hands of Aurangzeb for about eighteen years and succeeded to the Maratha throne in 1707 A.D. His claims were opposed by the famous Tārābāī of Kolhapur, but with the help of Bāḷājī Viśvanātha, Dhanājī Jādhava, Khaṇḍerāo Dābhāḍe and others, his power was stabilized, though it resulted in the establishment of two independent Maratha states one at Kolhapur and the other at Satara. Shāhū managed the affairs of the latter state with characteristic geniality and tact. His long rule ending in his death in 1749 saw a rapid expansion of the Maratha power in all directions.

छत्रपति शाहू महाराज

Chhatrapati Shāhū

सरदार पिलाजी जाधव

GENERAL PILĀJĪ JĀDHAVA

सरदार पिलाजी जाधव

जन्म : ?　　　　　　　　　　　　मृत्यु : श. १६७३ आषाढ वद्य ६

औरंगजेबाच्या कैदेंतून सुटून शाहू महाराष्ट्रांत येतांच इतरांबरोबर पिलाजी जाधवही त्यास जाऊन मिळाला. बाळाजी विश्वनाथ पेशव्यास चंद्रसेन जाधवाच्या कैचींतून यानेंच सोडविलें. यामुळें छत्रपति व पेशवे या दोघांचाही याच्या घराण्यावर फार लोभ जडला. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, चिमाजी आप्पा, बाळाजी बाजीराव व सदाशिवराव भाऊ यांनीं उत्तरेंत व दक्षिणेंत ज्या अनेक स्वाऱ्या केल्या त्यांपैकीं बहुतेकांत हा प्रमुखपणें वावरला; येवढेंच नव्हें तर यानें स्वतःही कित्येक स्वाऱ्या काढल्या होत्या. हा शिंदे-होळकरांच्या तोलाचा सरदार असतांही हुजरातींत राहिल्यामुळें संस्थानिक बनूं शकला नाहीं.

GENERAL PILĀJĪ JĀDHAVA

Birth :　　　　　　　　　　　　Death : 3-7-1751 A.D.

Pilājī Jādhava, the right-hand-man of Bājīrāo, the Great, was a veteran soldier and rose to fame in the days of the Peshwa Bāḷājī Viśvanātha. For forty years he was one of the front-rank nobles in the Maratha government and distinguished himself by his valour, capacity and wisdom. He was a great pillar of the State and a high dignitary in the *Hujaat* or the standing army of the Peshwas.



सरदार पिलाजी जाधव General Pilājī Jādhava

बाजीराव बल्लाळ पेशवे

PESHWA BĀJĪRĀO BALLĀḶA

बाजीराव बल्लाळ पेशवे

जन्म : श. १६२२ भाद्रपद शु. १५ मृत्यु : श. १६६२ वैशाख शुद्ध १३

बाळाजी विश्वनाथ मरतांच छत्रपति शाहूनें त्याचा मुलगा बाजीराव यास मुख्य प्रधान केलें. या जागेवरील मनुष्यास लष्करी स्वाऱ्या व राज्यकारभार अशीं दोन्ही कर्तव्यें पार पाडावीं लागत. पैकीं राज्यकारभाराचें काम मुख्यतः आपला धाकटा भाऊ चिमाजी आप्पा यावर सोपवून यानें प्रायः लष्करी स्वाऱ्यांचें संचालकत्व आपणाकडे घेतलें आणि आपल्या वीस वर्षांच्या कारकिर्दीत दक्षिणेंत व उत्तरेंत सुमारें वीस स्वाऱ्या केल्या. त्यांतील पालखेड, बुंदेलखंड, डभई, राजपुताना, दिल्ली व भोपाळ या विशेष प्रसिद्ध आहेत. मुख्यतः हे दोन भाऊ आणि जाधव, पवार, शिंदे, होळकर इत्यादि सरदार, यांच्या उद्योगानें मराठी राज्याचें साम्राज्यांत रूपांतर होऊं लागलें.

PESHWA BĀJĪRĀO BALLĀḶA

Birth : 18–8–1700 A.D. Death : 27–4–1740 A.D.

Bājīrāo, the Great, succeeded his father Bāḷājī Viśvanātha, the first Peshwa of Chhatrapati Shāhū, in 1720. Together with his able and gifted brother Chimājī, Bājīrāo launched vigorous campaigns in the North and soon made a name for himself as the greatest master of the gorilla warfare. He gathered round him a band of trusty and doughty captains and delivered mighty thrusts against the Nizam and the other enemies of the Maratha Empire. In fact, if Shivājī, the Great, founded the Maratha Svarājya, Bājīrāo developed it into the Maratha Empire. As a cavalry captain he was unequalled. He passed the major part of his life in the tent. He humbled the proud Nizam, befriended the Rajputs led by Savāī Jaisingha and shook the power of Delhi. He died in 1740.

बाजीराव बल्लाळ पेशवे Peshwa Bājīrāo Ballāḷa

बाळाजी बाजीराव पेशवे

PESHWA BĀḶĀJĪ BĀJĪRĀO

बाळाजी बाजीराव पेशवे

जन्म : श. १६४३ मार्गशीर्ष वद्य १३ मृत्यु : श. १६८३ ज्येष्ठ वद्य ६

पहिल्या बाजीरावानंतर त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव यास पेशवेपदाचीं वस्त्रें मिळालीं. याच्या ठिकाणीं सेनापतित्वापेक्षां कारभारी कौशल्य अधिक होतें. यानें आपले भाऊ व सरदार यांच्या मदतीनें दक्षिणेंत व उत्तरेंत स्वाऱ्या करून मराठा साम्राज्याचा विस्तार केला. इ. १७४९ मध्यें शाहू वारल्यावर मराठी राज्याचा सर्वच भार याजवर येऊन पडला. इ. १७५२ मध्यें मुघली साम्राज्य चालविण्याची व त्याच्या शत्रूंचा निःपात करण्याची जबाबदारीही मराठ्यांवर येऊन पडली. यामुळें हिंदुस्थानभर साम्राज्य करण्यास वाव मिळून मराठ्यांनीं पेशावरपर्यंत धडक मारली; शेवटीं त्यांस अहमदशाह अब्दालीसारख्या शत्रूशीं पानिपतावर लढावें लागून त्यांचें अतोनात नुकसान झालें व त्यांची प्रगति प्रायः खुंटली.

PESHWA BĀḶĀJĪ BĀJĪRĀO

Birth : 6–12–1721 A.D. Death : 24–6–1761 A.D.

The eldest son of Peshwa Bājīrāo I, Bāḷājī *alias* Nānāsāhib served at the court of Shāhū as the Peshwa's agent for some years and succeeded his father as Peshwa in 1740. During his regime of 21 years, he managed the affairs of the Maratha Empire with dignity and pomp. This was a period of great territorial acquisition to the Maratha Empire and the Maratha sway extended even beyond the frontiers of Delhi in the North, till the bank of the Ganges in the East and till the Kaveri in the South. The Marathas became a sovereign power in India during this period. However in 1761 on the historic field of Panipat, the Marathas met with a severe set-back at the hands of Aḥmadshāh Abdālī, the Durrānī leader and Nānāsāhib died of shock soon after.



बाळाजी बाजीराव पेशवे   Peshwa Bāḷājī Bājīrāo

सरदार जयाप्पा शिंदे

GENERAL JAYĀPPĀ SHINDE

सरदार जयाप्पा शिंदे

जन्म : ? मृत्यु : श. १६७७ आषाढ वद्य १

राणोजी वारल्यावर त्याचा मुलगा जयाप्पा शिंदे घराण्याचा प्रमुख बनला. राजपुताना व मध्य हिंदुस्थान यांत शिंदे व होळकर यांनीं अनेक स्वाऱ्या जोडीनें केल्या होत्या. इ. स. १७५१ मध्यें यांनीं अंतर्वेदींत रोहिलेपठाणांची लांडगेतोड केल्यामुळें मुघल बादशाहानें यांच्या मध्यस्थीनें अंतर्बाह्य शत्रूंपासून आपल्या साम्राज्याचें रक्षण करण्याचा मराठ्यांशीं करार केला. इ. स. १७५३-५४ च्या जाट स्वारींत यांचें जूग फुटून दोघेही स्वतंत्रतेनें स्वाऱ्या करूं लागले. जोधपूरचें राज्य बळकाविणाऱ्या बिजेसिंगाविरुद्ध न्याय्य वारस रामसिंग यास मदत करण्यासाठीं हा राजपुतान्यांत गेला असतां नागोरच्या वेढ्यांत याचा दग्यानें खून झाला.

GENERAL JAYĀPPĀ SHINDE

Birth : Death : 24-7-1755 A.D.

The house of the Sindhias founded by Raṇojī in the days of Chhatrapati Shāhū occupied a pre-eminent position in the Northern affairs of the Marathas for nearly three quarters of a century. Jayāppā was the son of Raṇojī. A valiant captain, Jayāppā shared with his elder colleague Malhārarāo Hoḷkar-*Sardars* as they were called-the enthusiastic encomiums of the Peshwas for their resounding victories against the Rohillas, Jats and the Rajputs. He was a principal party to the great pact between the Marathas and the Delhi Emperor which secured for them extensive rights and privileges. Jayāppā was treacherously murdered at Nagore in Rajaputana.



सरदार जयाप्पा शिंदे General Jayāppā Shinde

माधवराव बल्लाळ पेशवे

PESHWA MĀDHAVARĀO BALLĀḶA

माधवराव बल्लाळ पेशवे

जन्म : श. १६६६ माघ वद्य ११।१२   मृत्यु : श. १६९४ कार्तिक वद्य ८

बाळाजी बाजीरावानंतर हा पेशवेपदावर आला. वयानें लहान व शरीरानें अशक्त होता तरी अनेक सद्गुण याच्या ठिकाणीं होते. चुलत्याच्या सतत विरोधाचा समाचार घेऊनही पेशवाईचा कारभार यानें अशा तऱ्हेनें चालविला कीं, याच्या ११।। वर्षांच्या छोट्या कारकिर्दीत पानिपतचें नुकसान भरून निघून भीमथडीच्चीं तट्टें पुनः दक्षिणेस कावेरींत व उत्तरेस गंगेंत न्हाऊं लागलीं. भटकणारा मुघल बादशाह इंग्रजांचें संरक्षण सोडून देऊन मराठ्यांच्या आश्रयानें पुनः दिल्लीच्या तक्तावर बसला. यानें दक्षिणेंतील तीन स्वाऱ्या स्वतः चालविल्या. क्षयानें आजारी होऊन जगत नाहीं अशी खात्री झाल्यावर चुलत्याचे अपराध विसरून त्याशीं यानें स्नेह केला व योग्याप्रमाणें प्राण सोडला. याची पत्नी रमाबाई हिनें सतीचें दिव्य करून आपल्या नवऱ्यास आणखी मोठेपणा मिळवून दिला.

PESHWA MĀDHAVARĀO BALLĀḶA

Birth : 16-2-1745 A.D.   Death : 18-11-1772 A.D.

Called to the *Gadi* in 1761 after the death of his father, Nānāsāhib due to the Panipat disaster young Mādhavarāo was confronted with a most difficult and delicate situation further complicated by domestic dissentions fostered by his uncle Raghunātharāo *alias* Rāghobā. Young Mādhavarāo showed remarkable tenacity, great bravery and supreme wisdom, and brought order out of *chaos*. In the North the Marathas retrieved their lost position, where as in the South Mādhavarāo successfully checked the rising power of Ḥaidar ʻAlī and drove him to the walls of Seringpatam. His name became a terror. He was a great disciplinarian. His brilliant career was cut off prematurely in 1772.

माधवराव बल्लाळ पेशवे Peshwa Mādhavarāo Ballāḷa

छत्रपति प्रतापसिंह

CHHATRAPATI PRATĀPASIṀHA

छत्रपति प्रतापसिंह

जन्म : श. १७१४ माघ शुद्ध ७ मृत्यु : श. १७६९ आश्विन शुद्ध ५

हा दुसऱ्या शाहूचा वडील मुलगा. हा गादीवर आल्यापासून प्राय: पेशव्यांच्या कैदेंतच होता. म्हणून हा व दुसरा बाजीराव पेशवा यांमध्यें वितुष्ट पडून यानें इंग्रजांची मदत मागितली. त्यांनीं ती मोठ्या आनंदानें दिली. यामुळें बाजीराव व ब्रिटिश यांमध्यें वितुष्ट वाढून त्याचें पर्यवसान खडकी–अष्टींच्या लढाईत झालें आणि आपला सेनापति बापू गोखले यास गमावून बाजीरावास इंग्रजांना शरण जावें लागलें. इंग्रजांनीं पेशव्यांचे अधिकार व प्रांत आपल्याकडे घेऊन त्यांवर छत्रपतींच्या नांवानें राज्य-कारभार सुरू केला आणि छत्रपतीस सुमारें एका जिल्ह्याचा नामधारी राजा बनविलें. पुढें त्यावर नवनवीं बंधनें लादण्यांत येऊं लागलीं. तो तीं मानण्यास तयार होईना. तेव्हां इ. १८३९ मध्यें इंग्रजांनीं त्यास पदच्युत करून काशीस पाठविलें. तेथें तो इ. १८४७ मध्यें मरण पावला.

CHHATRAPATI PRATĀPASIṀHA

Birth : 18–1–1793 A.D. Death : 14–10–1847 A.D.

Reared under British tutelage this young Chhatrapati exhibited commendable powers of the head and the heart. The Maratha power was already on the decline and the helpless Chhatrapati had his power restored to him over only a few districts and this even he could enjoy for not more than twenty years. He fell a prey to evil machinations in which some very high British officials were involved and inspite of his very spirited appeals he was compelled to abdicate and was sent as an exile to Banaras where he had to live on a small pittance and died in 1847.

छत्रपति प्रतापसिंह Chhatrapati Pratāpasiṁha

बाजीराव रघुनाथ पेशवे

PESHWA BĀJĪRĀO RAGHUNĀṬHA

बाजीराव रघुनाथ पेशवे

जन्म : श. १६९६ पौष शुद्ध ९ मृत्यु : श. १७७२ पौष शुद्ध १२

सवाई माधवराव निपुत्रिक मेल्यानें बाजीराव, त्यास झालेला विरोध अनाठायी होऊन, पेशवा बनला. पेशवा होतांच हा विरोधकांस छळूं लागल्यानें व आंगच्या कर्तृत्वहीन दुर्गुणांमुळें सर्वांस अप्रिय झाला. पूर्वींचे कित्येक कर्तबगार लोक मेले व कित्येक घरीं बसले. यामुळें हा उघडा पडून इंग्रजांची साह्यपद्धत यास स्वीकारावी लागली. सेनापति बापू गोखले येवढा एकच काय तो कर्तबगार पुरुष त्याजकडे टिकून राहिला. स्वजन व छत्रपति यांशीं विरोध करतां करतांच इंग्रजांशीं युद्ध पुकारल्यानें याचे एकसारखे पराभव होत जाऊन यास इंग्रजांना शरण जावें लागलें. त्यांनीं यास पदच्युत केलें व पेन्शन देऊन ब्रह्मावर्तास ठेवलें. अशा तऱ्हेनें पेशवाई संपली.

PESHWA BĀJĪRĀO RAGHUNĀTHA

Birth : 10-1-1775 A.D. Death : 14-1-1851 A.D.

Born of Raghunātharāo and Anandībāī at Dhar and kept under surveillance at Kopargaon and Junnar he ultimately was installed as Peshwa in 1796. Till his death in 1800, the great statesman Nānā Phaḍnavīs tried to keep up the fast declining Maratha power. Under the vigorous drive of the Wellesley brothers the weak and the vacillating Bājirāo signed away a large part of his territory to the East India Company by the treaty of Bassein. Misrule became the order of the day. Sustained by the British for some time, the tottering and shrinking edifice of the Maratha Empire totally collapsed in 1818 when the inglorious Peshwa was sent off as a pensioner to Brahmāvarta near Kānpūr where he died in 1851.

बाजीराव रघुनाथ पेशवे   Peshwa Bājīrāo Raghunātha

सरदार बापू गोखले

GENERAL BĀPŪ GOKHALE

सरदार बापू गोखले

जन्म : श. १६९९ मृत्यु : श. १७३९ माघ शु. १४।१५

याचें मूळ नांव नरहर गणेश. याचा चुलता धोंडोपंत. त्यानें बदामीच्या (विजापूर) वेढ्यांत विशेष पराक्रम दाखविल्यामुळें त्यास स्वतंत्र सरंजाम मिळाला. पुढें धोंडजी वाघानें चालविलेल्या पुंडाईचा मोड करण्यासाठीं काढलेल्या स्वारींत तो मारला गेल्यावर त्याचा सरंजाम बापूस मिळाला. बापूनें इंग्रजांच्या साह्यानें वाघाची पुंडाई मोडून काढली. प्रतिनिधि व ताई तेलीण यांचें बंड यानेंच मोडून काढिलें. शेवटच्या इंग्रज-मराठे युद्धांत यानें खडकी, कोरेगांव, अष्टी या लढायांत पराक्रम दाखविला तरी शेवटच्या लढाईत हा कामास आला. हाच पेशवाईतील शेवटचा ब्राह्मण सेनापति होय.

GENERAL BĀPŪ GOKHALE

Birth : 1777 A.D. Death : 20-2-1818 A.D.

Bāpū Gokhale, the last Brāhmaṇa general of the Peshwa period took his first lessons under his uncle Dhoṇḍopanta and the wellknown Paṭavardhana leader Paraśurāmabhāū. Bāpū made a name when he helped in the suppression of the rebel Dhoṇḍajī Vāgha. He was faithful to his master and showed some vigour in putting down Pratinidhi, Chaturasiṅgh Bhosale and other petty nobles. He fell fighting for the Maratha Empire at the battle of Ashti against the British in 1818.

सरदार बापू गोखले General Bāpū Gokhale